# प्रकरण तिसरे

## दि. बा. मोकाशींच्या कथांचे वर्गीकरण --

अ - कौटुंबिक कथा

ब - सामाजिक कथा

क - प्रेमकथा

ड - बालकथा

इ - प्राणिजिवनावरील कथा

# प्रकरण तिसरे

## दि.बा.मोकाशींच्या कथांचे वर्गीकरण --

मोकाशींचे कथाविश्व प्राधान्याने मध्यमवर्गीय अनुभवांशी निगडित आहे. मध्यमवर्गीयांचे कौटुंबिक जीवन, त्यांच्या संसारात उठणारे खटले, जीवन जगताना त्यांना भेडसावणारे कौटुंबिक तसेच सामाजिक प्रश्न, हातातोंडाची मिळवणी करतांना त्यांची उडालेली तारांबळ याचे वर्णन ते जसे करतात तसेच तरुण वयातील स्त्री-पुरुषांना एकमेकांबद्दल वाटणारे आकर्षण व त्यातून प्रेमात होणारे रुपांतर याचे दर्शनही ते अतिशय भावुक व हृदयस्पर्शी संवादातून घडवितात. बालमनावर प्रकाश टाकणाऱ्या कांही कथा त्यानी जशा लिहिल्या तशाच प्राणीजीवनावरही कथा लिहिल्या. तेव्हा 'लामण दिवा', 'आमोद सुनासि आले', 'पाच हजार गायी' या कथा संग्रहातील कथांचे आपण वर्गीकरण करु.

### अ) कौटुंबिक कथा --

मोकाशींनी आपल्या कथेतून मध्यमवर्गीयांच्या कौटुंबिक अनुभवावरच अधिक भर दिलेला आहे. वेगवेगळ्या वयातील, परिस्थितीतील स्त्री-पुरुषांचे प्रेमानुभव, घराघरांतून दिसणारे बालमनाचे आवेग आणि सर्वसामान्य माणसांच्या मनात आपल्या अनुभवानुसार चालणारे परिस्थितीचे अर्थशोधन त्यांच्या कथेतून साध्यासुध्दा आकाराद्वारे साध्याच भाषेत प्रकट झाले आहे.

दोन एकाच विचाराच्या व्यक्ती एकमेकांच्या सानिध्यात येऊन घरातील खेळीमेळीच्या वातावरणामुळे एक जीव होतात व दिलखुलास चर्चा करुन आपल्या जीवनाचे आडाखे आखतात. याचे प्रत्यंतर 'काय रानटी लोक आहेत !' या कथेतून घडते.

सांगून आलेली मुलगी शाम पसंत करतो व योगायोगाने पूर्वीच्या असलेल्या कौटुंबिक संबंधानेच त्यांच्यातील परकेपणा नष्ट होतो. ती त्याच्या घरी येऊ जाऊ लागते. त्यामुळे ती दोघे एकमेकांचा चांगला परिचय करून घेतात तो परिचय इतका होतो की आपलं लग्न कशा पध्दतीने करायाचे , लग्न झाल्यानंतर कसे वागायचे, एकमेकांना कसे समजून घ्यायचे याच ही खुल्या दिलाने चर्चा करतात. एक दिवस तिची येण्याची वेळ टळून गेल्यामुळे तो अस्वस्थ होऊन वरखाली फे-या घालत असता ' हा असा काय फिरतोय ?' असे कोणीतरी त्याच्या बहिणीला म्हणते तेव्हा ' ती एक लघुकथा आहे. एक तो होता नि एक ती होती. ती रोज संध्याकाळी येत असे. एक दिवस ती आली नाही ' [१] असे म्हणणा-या बहिणीकडे तो डोळे वटारून पाहतो. तेव्हा ' डोळे काय वटारतोस ? मी काय डोळ्यात शिरणार आहे ? हे पहा, ती आज येणार नाही ?'

' ती कोण ?'

' संध्याकाळी येत असे ती '

' वा ' म्हणजे आधचिी ओळख आहे वाटतं ? मग डबल लाडू दिले पाहिजेत. ' [२]

अशी संभाषणे होतात.

या सर्व संभाषणातून त्यांच्या घरचे कौटुंबिक जीवन प्रत्ययाला येते.

एकाच गावात राहणा-या दोन घरातील माणसांचा असलेला कौटुंबिक संबंध सिंधू व केशव यांच्या अनुषंगाने कसा फुलत जातो याचे दर्शन घडविणारी ' नकोरे आत येऊ , केशव ।' ही कथा आहे .

एकमेकावरील प्रेमामुळे व घरच्या कौटुंबिक संबंधामुळे सिंधू केशवच्या आईला गंध उगाळून दे, वाती वळून दे अशी मदत करत असते. आपण मुंबईलाजाताना ' मी जाऊ का नको ?' असे त्याला विचारते व ' आईनं गाडी मागितलीय स्टेशनवर जायला ' [३] असे लबाडच सांगते . गाडीत त्याने पुढे बसण्यास सांगताच ती पुढे बसते. त्याने ' पत्र धाडू मी ?' असे विचारताच गोरीमोरी होते व त्याच्याकडे पाहून मोठ्ठाले डोळे करून मागे मावशी जवळ सरकते. आईने सांगितल्याप्रमाणे केशवने केलेल्या तारेमुळे ती गावी परत येते. ती घरी पोहोचताच केशव घरी जाऊन तिला भेटतो.

दोन कुटुंबातील संबंध, आपुलकी,प्रेममय वातावरण याच प्रत्यंतर घडविणारी ही कथा सरस आहे.

दि.बा.मोकाशी प्रेममय कौटुंबिक जीवन मार्मिकपणे व्यक्त करताना कथा जशी एखाद्या उमलणाऱ्या फुलाप्रमाणे फुलविताना दिसतात. तसेच एखाद्या शुल्लक कारणामुळे घरात होणाऱ्या संघर्षाचेही वर्णन तितक्याच मार्मिकपणे करताना दिसतात. `नास्तिक` ही कथा याचेच उदाहरण आहे.

प्रो.काळे व त्यांची पत्नी देवकी यांच्यामध्ये शुल्लक कारणावरून झालेल्या संघर्षामुळे काळेंचा पूर्ण दिवस निरस व निर्जीव होतो. `बाहेरगावी जातानाच देवकी भांडण का काढते ? भांडण झालेले असले की,आपला सगळा प्रवास वाईट होतो तिला हे कसे कळत नाही ? आपले व्याख्यानही निर्जीव होते`[4] या विचाराने ते अस्वस्थ होतात. म्हणूनच पंढरपूरच्या विठ्ठलाचे देऊळ, तेथील मूर्ती पाहत असताना त्यांना तिचीच आठवण येत राहते. आपण भांडलो ही चूक केली. गावाला जाताना भांडलो हे तर साफ चुकले असेही त्यांना वारंवार वाटू लागते. पण त्याच वेळी देवकीनेच भांडण काढले मग तिने माघार का घेऊ नये असे अहंकारी मन जागृत होऊन उठे पण तात्काळ मनात येणाऱ्या अनेक शंका कुशंकानी ते विव्हल होत व मनातल्या मनात तिच्याशी संवाद साधत , `तुझे दुसऱ्या कुणावर प्रेम आहे का ? म्हणून का तू निघून गेलीस ? नाही ना । अशी भयंकर गोष्ट तुझ्या हातून होणार नाही.झाली तर ? मी जगणार नाही. खरे सांगतो देवकी । कसा जगू सांग ? देवकी कसा जगू सांग ? ``[5] आणि त्यांचा चेहरा वेदनेने कळवळे,ओठ भरभर कापू लागतात व विलक्षण दुःखाने त्याचे डोळे भरून येत.

कुटुंबामध्ये संघर्ष हा सतत होत असतो तो जसा पती-पत्नीमध्ये होतो तसाच भावा-भावामध्ये-ही होताना दिसतो. हा संघर्ष व्यक्त करताना मोकाशी अगदी बारिक-सारिक गोष्टीकडे जाणीवपूर्वक लक्ष देताना दिसतात. त्यांची `गावाकडे` ही कथा हेच सांगते.

घरातील दारिद्र्यातून सुटका करून घेण्यासाठी घराबाहेर पडलेला व अनेक हालअपेष्ठा सहन करून आपली उन्नती करणारा राजा काळे भावाच्या बदफैली वर्तनामुळे हैराण होतो. लोकांच्या पत्राने अस्वस्थ होऊन त्याला मुंबईला आणण्यास

निघालेला राजा काळे गाडीतच दु:ख ओकून मोकळा होतो. " माझा धाकटा भाऊ सारंगला असतो त्याला मुंबईला घेऊन जायला मी चाललो आहे. मला हा एकटाच भाऊ आहे. पण आजकाल भाऊ कसे वागतात हे तुम्हाला ठाऊकच आहे । हा भाऊ हा दिवटा - मला लाज आणायला निघाला आहे. मी त्याला पन्नास वेळा लिहिलं मुंबईला ये.तो येत नाही नि तिथंही चांगला राहत नाही. हे पहा - हे पहा --"[६] आणि रागाने खिशातील पत्रे काढून लोकांना दाखवितो व एक वाचूनही दाखवितो.

कधी कधी मृत्युसारखी एखादी आपत्ती कुटुंबावर येते व संपूर्ण कौटुंबिक जीवनच विस्कळीत होते. जीवनाचा अर्थ लोपल्यासारखा वाटू लागतो व जीवन असह्य होते. " आता आमोद सुनासि आले " ही कथाही हेच व्यक्त करते.

केंबळ खेड्यात राहणाऱ्या रामजी लोहाराचा एकुलता एक मुलगा सतत पडणाऱ्या पावसाच्या पूरा-बरोबर वाहून गेल्याने पहाडासारखा असणारा रामजी लोहार निर्जीवासारखा भात्याला टेकून बसला होता तो चार दिवस झाले तरी उठला नव्हता. त्याच्या मनात एकच एक कोरडा प्रश्न येतो " आपला मुलगा कां जावा ? विठ्ठला । तू हे काय केलंस ? मुलानं असा काय अपराध केला होता ? त्याचं आयुष्य असं अर्ध्यावर का संपावं ? नि मी म्हातारपणी नि:संतान होऊन रडत का बसावं ?"[७] आणि तीन वर्षांची पंढरीची वारी करूनही आपल्या पदरात पडणाऱ्या दु:खामुळे तो आपल्या प्राक्तनाला दोष देतो. आपण ऐकलेली ज्ञानेश्वरीची पारायणं सुध्दा त्याला खोटी वाटू लागतात. जग खोटं,मी खोटा, ज्ञानेश्वर नि विठ्ठलही खोटा वाटू लागतो.तो जेव्हा वाण्याच्या माळ्यावर जातो तेव्हा जोशीबुवांना गाडीचे आस तापवून दणादण घणानं ठोकणारा रामजी,घाम निथळत असता हसत पोरांना कोट्या करून हसवणारा रामजी व एखाद्याचे जनावर आजारी पडलं अथवा अडलं की धावणारा रामजी तो हाच का ? असा प्रश्न पडतो. परमेश्वरानं माणसाचं मन विसराळू केलं आहे ही केवढी दया आहे. तेव्हा रामजी सर्व दु:ख विसरून जाईल असे त्याला वाटते. त्यावेळी संत् वाणी वाचीत होता.आणि अर्थ न समजूनही सर्व माना हलवत होते. त्याचवेळी रामजीच्या मनात आपल्या मुलाला वाहून नेणारा पूर व पुराबरोबर वाहात असलेला मुलाचा देह दिसतो. अशा दु:खी अवस्थेतही नेमाण्याची अडलेली गाय

मोकळी करण्यासाठी त्याला धावावे लागते. गाय मोकळी करून तो परत येतो. त्याचा चेहरा भावनांनी भरू लागतो व तो रडू लागतो.

कधी कधी ड्रायव्हरच्या वाट्याला येणारे कौटुंबिक जीवन व्यक्त करून मोकाशी त्याच्या मनाचे विश्लेषण करताना दिसतात. 'लॉरी' ही कथा हेच व्यक्त करते.

लॉरी ड्रायव्हर हा नेहमी घरा बाहेरच राहणारा. इच्छा असून सुध्दा घरच्या सौख्याला व मायेला दुरावलेला, बहिणीला भेटण्याची, तिचे गोड शब्द ऐकण्याची इच्छा असूनही तिच्या लग्नातच तो तिला भेटतो. तिच्या लग्नानंतर आपण पोरके होणार याचे शल्य त्याला नेहमी शलत असते हे त्याच्या बोलण्यावरून स्पष्ट होते. 'मला पाहताच इतका आनंद झाला तिला ! धावत आली मला मिठी मारायला. पण माझा सगळा आनंद एकदम गेला. तिचे दोन्ही हात धरले. मनात आलं - माझी छबडी जाणार या घरची नाही आता ती. लग्नानंतर तिच्या नवऱ्याकडे जाऊन तिला भेटता येईल पण पहिली गंमत नाही. मी जाईन, तिला आतून कोणीतरी बोलावतील, मी बाहेर बसलेला असेन, ती दारात येऊन उभी राहील, मी कसं काय विचारीन, बस.' हा विचार मनात येताच तो दुःखी होतो.

हुंडयाचा प्रश्न हा सामान्यानाच नव्हे तर सर्वानाच भेडसावत असतो. त्या प्रश्नाने इंजिनिअर देगावकरा सारख्या कुटुंबातही अस्वस्थता निर्माण होते. 'पाच हजार गायी' ही कथा हेच सूचित करते.

सत्तर वर्षाच्या देगावकरांना कानात गुणगुणण्याचे आवाज येत असून रक्तदाब वाढला असतानाही आपल्या शेवटच्या मुलीच्या लग्नात द्याव्याच्या हुंडयासाठी नोकरी पत्करावी लागते व मानसिक त्रासही सहन करावा लागतो. 'कण्वाच्या काळी नवरा मुलगा पाच हजार गायी मागत होता ! आजचा नवरा मुलगा पाच हजार रुपये मागत होता. शिवाय वर-खर्च' म्हणूनच त्यांना तिसऱ्या नोकरीशिवाय पर्याय नव्हता.

हुंडयाचा प्रश्न मग तो गायीच्या रुपाने असो वा धनाच्या सर्वांचीच झोप मोड करतो व कौटुंबिक जीवन उद्ध्वस्त करून सोडण्यास कारणीभूत ठरतो. हा ज्वलंत प्रश्न या कथेतून मोकाशींनी मांडून प्राचीन व अर्वाचीन समाजाचे चित्र रेखाटले आहे.

कधी कधी माणसाच्या वाट्याला येणारे दारिद्र्य त्याचे कौटुंबिक जीवन बिघडण्यास कारणीभूत ठरते हे दारिद्र्य प्रामाणिकपणे कष्ट करून सहजासहजी नष्ट होत नाही. म्हणून या दारिद्र्यापासून स्वत:ची व आपल्या कुटुंबाची मुक्तता करून घेण्यासाठी चोरी करण्यास प्रवृत्त झालेले बारामतीकर ' सुटका ' या कथेतून पाहावयास मिळतात.

दारिद्र्यामुळे होणारी कौटुंबिक ओढाताण, संसाराचा गाडा ओढताना होत असलेली परवड थांबविण्यासाठी बँकेत कामाला असलेले बारामतीकर चोरी करतात. आपली बेअब्रू होणार, तुरुंगातून सुटल्यानंतरही इज्जतीने जगता येणार नाही याची जाणीव असून सुध्दा पन्नास हजाराची चोरी करून दहा वर्षांची शिक्षा भोगण्यास तुरुंगात जातात, ते कर्जाचा डोंगर हलका करण्यासाठी, घर वाचविण्यासाठी, मुलांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी व बायकोचे हाल थांबविण्यासाठी. त्यांना वाटतं ' आपण पन्नास हजाराच्या नोटा लपवल्या नसत्या तर ती अधिक थकली असती ~~नाही~~ का ? पुढ संसाराच्या वाढत्या ओढघस्तीनं ती अधिक करपली नसती का ? पुढ दिसणारं दिवाळं ... मुलांचा भार ... शिक्षण ... शेजारीपाजारी सुख पाहून ती जास्त कष्टी झाली नसती का ? ...'[10] मात्र सुटका झाल्यानंतर घरी परतत असता दुसऱ्याकडून समजलेल्या माहितीवरून आपल्या मुलानं वेगळं बिऱ्हाड थाटल्याचे ऐकून त्याचा उत्साह मावळतो व तो घरी न येता दुसऱ्या गावी जातो.

प्राचीन काळी मोठ्याप्रमाणात व सध्यासुध्दा थोड्या प्रमाणात अस्तित्वात राहिलेली आणखी एक समस्या म्हणजे जरठकुमारी विवाह. या विवाहामुळे कौटुंबिक जीवनावर कसा अनिष्ठ परिणाम होतो तो ' मुरली ' या कथेतून पाहावयास मिळतो.

पन्नाशीच्या घरात असलेला मुरली अठरा वर्षाच्या कुमारिकेशी विवाहबध्द होतो. वयात व विचारात असलेल्या दरीमुळे तिला तो अकाली प्रौढ बनविण्याचा अट्टहास करीत असतो. प्रौढ बोलणे, नऊवारी नेसणे, केसांचा शेपटा न सोडणे, खिडकीतून डोकावून न पाहणे असा तो प्रौढत्वाचा संस्कार करू लागतो. ' ती पाचवारी नेसत होती. पण तो छचोरपणा मी बंद केला. नऊवारीत बाई कशी ठसठशीत, प्रौढ वाटते. तिलाही पटलं आता ।'[11] असे तो लेखकाला सांगतो तिने शेपटा सोडलेला पाहताच ' पुन्हा शेपटा सोडलात. किती वेळा सांगायचं ? हा छचोरपणा

टाकून द्या आता. अंबाड्यानं प्रौढपणा येतो." आता लहान नाही तुम्ही"[१२] असे बायकोला तो प्रौढपणाचे धडे देतो. शेवटी कंटाळलेली बायको एक दिवस वायरम्ना बरोबर पळून जाते व तो पूर्वीसारखा एकटा एकाकी राहू लागतो.

कुटुंबातील आजा .- आजीला आपल्या नातवंडांना अंगाखांद्यावर खेळवावं, त्याच कौतुक करावं, त्यांच्या हौसा पुरवाव्या असे वाटत असते आजीची म्हैस मधील आजीही याला अपवाद नव्हती .

शहरात असलेल्या आपल्या नातवंडाला दूध मिळत नाही, म्हणून आजी म्हैस घेते व महिनाभर त्यांना दुधा-तुपात बुडविण्यासाठी ती मी ला गावी येण्याचे पत्र पाठविते. पण कथेतील " मी " काही कारणास्तव गावी येऊ शकत नाही. दिवाळी जवळ आल्यावर आजीचे पत्र येते. " यंदा मुलांना घेऊन ये एकदा तरी त्यांना घरच्या म्हैशीचं दूध,तूप,लोणी खाऊ दे "[१३] पण आपण आजीकडं जायचं नक्की करनही मी ला जाता येत नाही.शेवटी आजी मरते.पण तिची इच्छा अपूर्णच राहते. लेखक बायको-मुलांसह जेव्हा गावी जातो तेव्हा रात्री अचानक वेड्यात त्याना म्हैस दिसते. तिची कास दुधाने भरलेली असते. लेखक व त्याची पत्नी दूध पितात व आजीची इच्छा पूर्ण होते.

लेखक या कथेतून अद्भुत घटनेचा अवलंब करताना दिसतात.

समाजामध्ये कांही अधिकार असलेल्या सरंजामशाहीतील रुढी-परंपरा व कौटुंबिक जीवन व्यक्त करणारी कथा म्हणजे " गोरी घारी मामी " ही कथा होय.

लग्न होऊन गढीमध्ये प्रवेश करणारी प्रत्येक स्त्री वैभवानं बुडवून टाकली जाते. तिला कोणत्याही गोष्टीची कमतरता नसते पण उणीव असते ती मुक्त जीवनाची. पिढ्यानपिढ्या सहन करत आलेली बंदिस्त जीवनाची बेडी सहजासहजी तिला मोडणे शक्य नसते. जर कोणी तसा प्रयत्न केला तर त्याला प्रायश्चित भोगावे लागते. प्रसंगी प्राणही गमवावा लागतो.

बंदिस्त जीवनाला कंटाळलेली सावित्रीची चुलत नणंद एका पाणक्याबरोबर पळून जाते. मात्र तो प्रयत्न अयशस्वी होऊन तिला सजा भोगावी लागते. " नदीवर पोहोचण्यापूर्वीच नणंद नाहीशी झाल्यावर ओरडा झाला. भाले, फरशा घेऊन

गडी झाडीत घुसले अर्ध्या तासात त्यानी थरथर कापणारी नणंद आणि रक्तबंबाळ झालेला तरुण पाणक्या, दोघांना गढीत पकडून आणले. नणंदेला एका काळोख्या खोलीत कोंडून टाकले आणि पाणक्याला पश्चिमेच्या एका तळघरात टाकले. ' या वरील वाक्यांवरुन तत्कालीन सरंजामशाहीत बंधन तोडणाऱ्यांना कशी जबर शिक्षा दिली जात होती याचे प्रत्यंतर येते.

या कथेतून मोकाशी तत्कालिन रुढी-परंपरांनी ग्रासलेल्या समाजाचे चित्रण करतात.

कांही कांही व्यक्ती स्वतःच बंदिस्त असतात. त्याचे कौटुंबिक जीवनही साचेबंद असते. या साचेबद्धपणाचे दर्शन घडविणारी ' पाकिट चोर ' ही कथा आहे.

विनोद कासेगावकराचे वडील स्टेशन मास्तर होते. त्यामुळे त्यांना घराबाहेर बोलावे लागे. पण घरी ज्यानं-त्यानं आपली काम न बोलता करणं एवढच त्याना माहीत होतं. हा दिनक्रम विनोदच्या बाबतीतही होता. पहाटे उठणे, थोडावेळ अभ्यास मग खाणं, अंघोळ, कधी कधी पूजा, घरात आईला काही लागलं सवरलं तर आणून देणं या गोष्टीत तो दिवसभर गुंतलेला असायचा म्हणूनच लग्न ठरुनही त्याची ही रक्तात भिनलेली सवय जाऊ शकत नाही. स्वतःला कामात गुंतवून घेतलेल्या विनोदला दुसरं कसलंही व्यसन नव्हतं, की चोरी लबाडी करावी हेही उमगत नव्हतं पण चोर म्हणून त्याला जेव्हा लॉकअप मध्ये डाबून ठेवले जाते तेव्हा तो अतिशय दुःखी होतो. आपली प्रतिष्ठा संपली असं त्याला वाटू लागतं. तो अंतर्मुख होतो म्हणूनच आपल्या भावी पत्नीकडे नेहमी जाणारा विनोद तिला टाळू पाहतो.

कोणत्याही अपेक्षा न ठेवणाऱ्या विनोद ला वधूकडील मंडळी जेव्हा भरपूर देवू करते तेव्हा त्याच्याकडून कोणतीही प्रतिक्रिया होत नाही. ' मुलीसाठी बिऱ्हाडाच्या तीन खोल्यांचा ब्लॉक मिळणार हे तिच्या वडिलांच्या बोलण्यात आलं ते कधीही त्यांनी आनंद दाखविण्याची घाई केली नाही किंवा अशी सासुरवाडी मुलाला मिळाली याची धन्यताही दाखविली नाही. '[१४] यावरुन त्याचे व त्याच्या कुटुंबातील व्यक्तींचे नाकासमोर जगण्याचे प्रत्यंतर येते.

कौटुंबिक जीवनाचा सहजगत्या घडणारा अविष्कार त्यांच्या

' म्हाता-याचे शेवटचे दिवस' या कथेतून पाहाव्यास मिळतो,

आजोबांवरील प्रेमामुळे सर्वच त्यांची काळजी घेतात. ' कमल' ही त्यांची लाडकी नात त्यांचं सर्व काही कौतुकाने करी. म्हणून सर्व तिला म्हणत, ' आजोबा सारी इस्टेट कमललाच देणार हं।'[१५] आजोबांचीही तिच्यावर मर्जी होती. त्यामुळेच ते तिच्या लग्नाची चालढकल करतात. शेवटी नाखुशीने ते तिच्या लग्नाला संमती देतात. तसंच त्यांच्या नंतरच्या नातेवं सुमाचही असतं. ती संभाषण चतुर असल्यामुळे व सर्व विषयात तिला गती असल्यामुळे राजकारण, मार्क्सवाद, भांडवलवर्ग, सरंजामशाही इ. सर्व बाबींविषयीची माहिती ती आजोबांना सांगते व तिच्यावरील प्रेमापोटीच ते तिचा पास झाल्याचा पेपरमध्ये आलेला नंबर सर्वांना दाखवत सुटतात.

आई-वडिलांच्या आपल्या मुलावर असलेल्या प्रेमापोटी त्यांचे कल्याण साधण्यासाठी तत्पर असलेले आई-वडिल ' रेडिओची गोष्ट' या कथेतून दिसतात.

नेव्हीमध्ये समुद्रावर असलेल्या आपल्या मुलाच्या कल्याणासाठी त्याची बालमैत्रीण ' शांता' हिच्याशी त्याचे आई-वडिल त्याचे लग्न पक्के करतात. तशी त्याला कल्पनाही दिली जाते तो तिच्याशी व आई वडिलांशी पत्राद्वारे वार्तालाप करीत असतो. सासू व भावी सूनेच्या परस्परावरील प्रेमामुळे एकमेकांना आलेली पत्रे मग ती कितीही खाजगी असोत एकमेकांना दाखविली जात. या व अशा कारणाने त्याचे आई वडिल , शांता, शांताचे आई वडिल या सर्वांमध्ये जिव्हाळ्याचे नाते तयार होते.

स्त्री व पुरुष ही संसाररुपी रथाची दोन चाके आहेत. एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. तेव्हा संसाराचा गाडा सुरळीत चालायचा असेल तर स्त्री व पुरुष यांनी एकमेकांना समजून घेणं , एकमेकांच्या विचारानं चालणं अतिशय महत्वाचे याची जाणीव नसणा-या व्यक्ती आपल्या संसाराचा खेळखंडोबा करुन सोडतात. ' तिचा नवरा' या कथेतील बंडू ही व्यक्ती अशीच आहे.

बंडूची पत्नी गोदू ही सालस, गुणवान व प्रेमळ सुगृहिणी असल्यामुळे घरातील सर्वांचे थोड्याच दिवसात मन जिंकते पण तिच्या लफंगी नव-याला ते पटत नाही. घरातून पळून जाण्यासाठी तो अनेक युक्त्या काढतो. व पळून जातो पण घराबाहेर

A
11975

मारलेली मजा पैशाअभावी अल्पकाळ टिकते. शेवटी त्याला नोकरीचा शोध घ्यावा लागतो पण सहजासहजी न मिळणाऱ्या नोकरीसाठी तिच्या भावाची मदत घ्यावी लागते. पण तीही नोकरी तो सोडून देतो व स्वत: धन्दा करायचा म्हणून धंद्यासाठी आणलेल्या वस्तू बायकोच्या श्रमावर पूर्ण होतात व ऐतखाऊपणाची त्याला सवय जडते. तिची प्रकृती बिघडल्याने व त्यातच तिचे दिवस भरल्यामुळे तो अस्वस्थ होतो. तिला तशा अवस्थेत टाकून आपल्या घरी जातो व तिनेच मला सोडून दिले असे फसवे सांगतो. त्याची वाट पाहून आपल्या मुलाला घेऊन आलेली गोदू मरण पावते तेव्हा दु:खाचा आव आणणारा तो गळ्यातील मंगळसूत्र नसलेले पाहून तिला शिवी हासडतो. शेवटी वडिलांच्या पायावर डोके ठेवून आपण निर्दोष असल्याचे सांगतो.

मोकाशी या कथेतून एका बेफिकीर, लफंग्या व विश्वासघातकी व्यक्तीचे चित्र मार्मिकपणे रेखटताना दिसतात.

वयाची एकवीस वर्षे उनाडगी करणाऱ्या मुलाला त्याच्या आईने आपल्या मृत्युसमयी दिलेला संदेश म्हणजे `स्वत:ला विसर` ही कथा होय.

गिरणीमध्ये काम करून स्वत:चे कुटुंब सावरणाऱ्या मातेचा एकवीस वर्षाचा उनाड मुलगा आईचे शेवटचे `स्वत:ला विसर` हे शब्द खरे करून दाखविण्यासाठी स्वत:ला विसरण्याचा प्रयत्न करतो. त्या शब्दांचा वेगवेगळा अर्थ घेऊन तो पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत असतो. आईच्या मृत्यूनंतर आपल्या भावंडाचा सांभाळ करतो. स्वत: गिरणीत प्रामाणिकपणे काम करतो. आईची आपण लग्न करण्याची इच्छा होती म्हणूनच तिने स्वत:ला विसर असे म्हटले असावे असे वाटून लग्न करतो. संसार करतो. गिरणी कामगारांच्या वतीने युनियनचे काम करतो. युनियनमधील कार्यकर्त्या मुलीच्या सहकार्याने नावाजलेला कार्यकर्ता होतो. वीस वर्षे बघता बघता निघून जातात. लगेच आईची आठवण होऊन तिचे वचन विसरल्याने तो दु:खी होतो. तिच्याकडे पाहताच तिचे ओठ हालल्याचा भास होऊन तिचे शब्द ऐकू येतात `बाळ कष्टी होऊ नकोस । माझ्या सांगण्याप्रमाणे तू वीस वर्षे वागला आहेस. स्वत:ला विसरायचं म्हणत होतास, तेव्हा स्वत:ला विसरता आलं नाही. मग गरिबांच्या सेवेला लागलास नि स्वत:ला विसरलास पण स्वत:ला विसरायचं हे देखील विसरलास माझं सांगणं पुरं केलं आहेत. आता जरा मागे नजर टाक`[१६] तो मागे पाहतो त्याच्या बरोबर काम

करणारी कार्यकर्ती त्याच्या आईला नमस्कार करत असते.तो तिच्याकडे वळतो व तिचा हात हाती धरून `माझी बायको होशील ?` असे विचारतो.

मोकाशींच्या या कथा कौटुंबिक जीवनाचे एकेक पदर उलगडून दाखवितात व मनाचा ठाव घेतात.

ब) सामाजिक कथा --

मध्यमवर्गीय माणसांच्या सुख-दुःखाशी मोकाशींची कथा सुसंवाद साधताना दिसते.परंतु ती सौम्य वृत्तीने त्यांच्या समकालीन लेखकांच्या साहित्याप्रमाणे जीवनातील दुःख,वेदना,समस्या यांचा बाजार न मांडता साहसी वृत्तीने जगणारी माणसे येथे भेटतात.त्यांच्या समस्या असल्याच तर त्या सुध्दा हालक्या फुलक्या रितीने सुटताना दिसतात.परंतु निराशेचा तत्कालीन सूर दिसत नाही.

मानवी जीवन म्हणजे जन्ममृत्यूचे रहाटगाडगे आहे असे रविन्द्रनाथ टागोर यांनी सांगितले आहे. प्रत्येकाला जगण्याची ओढ असते` त्याला मृत्यूही टाळता येत नाही.याची जाणीव असून सुध्दा त्या व्यक्ती दुःखी होतात आणि आपापल्या परीने जीवनाचा वेध घेऊन पाहतात.मोकाशींची बहुतेक पात्रे सौम्य प्रकृतीची आहेत. त्यामुळे दुःखाचा कडेलोट झाला की त्याचा बाजार न मांडता ती जड,गंभीर व अंतर्मुख होऊन जीवनाचा वेध घेऊन पाहतात. `आता आमोद सुनासि आले` या कथेतील रामजीही असाच आहे.

कोकणातील केंबळे नावाच्या खेडयात राहणाऱ्या रामजी लोहाराच्या एकुलता एक मुलगा रात्रभर कोसळणाऱ्या पावसामुळे आलेल्या पुराच्या पाण्यातून वाहून गेल्यामुळे शोकाकुल होतो.आपण वर्षानुवर्षे ज्ञानेश्वरीचे पारायण करूनही आपल्यावर अशी आपत्ती का यावी,मला म्हाताऱ्याला सोडून माझ्या तरूण मुलाला परमेश्वराने का बरे न्यावे ? हेच त्याला समजत नव्हते. तर दुसरीकडे संतुवाण्याच्या माळ्यावर रोज रात्री चालणारे ज्ञानेश्वरीचे पारायण रामजी नसल्याने थांबलेले असते.रामजी येताच त्याचे दुःख कसे कमी करावे,त्याला माणसात कसे आणावे हे मात्र कुणालाच समजत नव्हते.रामजीचा तर सर्वांवरचा विश्वास उडालेला होता.त्यामुळे पारायण सुरू असले तरी त्याकडे त्याचे लक्ष नव्हते.त्याला

पूरातून वाहून जाणाऱ्या आपल्या मुलाच्या प्रेताची जाणीव होऊ लागते व त्यामुळे तो गंभीर बनतो. याच वेळेला शेजारच्या शिवा नेमाण्याची गाय अडलेली असते. वेणांच्या वेदना असह्य होऊन ती हंबरडा फोडीत राहते. गायीची सुटका करणारी रामजी लोहार ही एकच व्यक्ती गावात असते पण ती तर अशी दुःखी कष्टी.

माणूस हा समाजप्रिय आहे. समाजातील व्यवहाराशी तो बांधलेला असतो. त्यामुळेच नेमाण्याच्या बायकोच्या विनवण्यांनी व गायीच्या जीव घेण्या हंबरडयाने रामजी मानावर येतो व गायीची शांतपणे, कुशलतेने सुटका करतो. गायीच्या कोवळ्या वासराला जगात आणताना जगातून नुकत्याच गेलेल्या स्वतःच्या मुलाचा प्राण त्याला आठवतो. वासरात येणारा जीव किंवा वासरातून जाणारा जीव कुठंतरी आपल्या हाती लागेल का ?[१७] असा त्याच्या दुःखातून निघालेला पण थोडसं त्या दुःखा बाहेर ही काढणारा प्रश्न त्याला पडतो.

वाण्यांच्या माळ्यावर चाललेले पारायण, पाण्याच्या लाल लोंढयात वाहत जाणारे प्रेत, थंड मनात्याशी मोत्यासारखा बसलेला रामजी, परमेश्वराला परखडपणे प्रश्न करणारा रामजी, वेणांनी विव्हल झालेली नेमाण्याची गाय, त्यामुळे अस्वस्थ होऊन रामजीला हाका मारणारी नेमाण्याची बायको, रामजीची गोठयातील लगबग या सर्व घटना डोळ्यासमोर जिवंत उभ्या राहतात. त्यामुळे संपूर्ण भावकथा मनाची पकड घेते. ही कथा मनोविश्लेषणात्मक कथा आहे.

समाजामध्ये जशी चांगली माणसे आहेत तशीच वाईटही आहेत. दुःखातही लोकांच्या सहाय्याला धावून जाणाऱ्या रामजी लोहारासारख्या व्यक्ती जशा आहेत तशाच अज्ञानी, दरिद्री अंधश्रध्द लोकांना लुबाडून अवैध मार्गाने स्वतःचे घर भरणाऱ्या गणू सावकारासारख्या व्यक्ती सुध्दा आहेत. "रात्र संपली दिवस उजाडला" ही कथा याचेच प्रतीक आहे.

दारिद्र्य आणि अंधश्रध्दा यांनी ग्रासलेल्या कोकणासारख्या अविकसित भागात मोकाशींनी आपला बराच प्राथमिक काळ घालविला व त्यामुळेच तेथील अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रध्दा, रूढीपरंपरा यात गुरफटलेल्या लोकांवर होत असलेला अन्याय

त्याना पाहाव्यास मिळाला. व तोच अनुभव या कथेच्या रुपाने त्यानी साकार केला आहे.

आपल्या खंडकऱ्यांकडून अवैध मार्गाने भात वसुली करण्यासाठी मग्रूर गणू साक्कार आपल्या हशा नावाच्या नोकरा बरोबर बैलगाडी घेऊन वानवडीला जातो व घरातील सर्व भात पोत्यात भरुन घरच्या लोकांच्या ओरडयाकडे दुर्लक्ष करुन गाडीत चढवितो. इतकेच नव्हे तर येतेवेळी परसातील पोपईची कच्ची फळं सुध्दा हक्कानं घेण्यास विसरत नाही. बरीच रात्र झालेली असते. पाऊस कोसळण्याचे चिन्ह दिसत असते तरीही तेथे न थांबता तो नोकराला गाडी जोरात हाकायला सांगतो. गाडी वाट चुकून जंगलात येते, त्यातच वाघाच्या डरकाळ्या कानावर येतात. साक्कार घाबरुन जातो व आपल्या नोकराला आपला जीव वाचविण्याची विनंती करतो. आपण केलेले गुन्हे, अन्याय सर्वच्या सर्व मान्य करतो. बक्षिसाचे आमीष दाखवितो व पहाट होताच आपण गावासमीप असून धोका टळलेला आहे याची त्याला जाणीव होते व त्याचा धूर्त, मग्रूरीपणा पूर्ववत जागृत होऊन ` हशा ` नोकराला चाक्काने मारीत गाडी सुरु करायला फर्मावतो.

मोकाशींनी गणूसाक्काराच्या व्यक्तिचित्राद्वारे मानवी स्वभावाचे उत्तम दर्शन घडविले आहे. तसेच सावकारी कर्जाच्या डोंगराखाली चिरडलेल्या, पिढयान्‌पिढया चिरडत आलेल्या व मुकाटयाने सर्व अन्याय, पिळवणूक सहन करणाऱ्या ग्रामीण लोकांचे चित्रही आपल्यापुढे उभे केले आहे.

कधी कधी खेडयातील अज्ञानी माणसांमध्ये साध्या साध्या गोष्टीवरुन वैमनस्य निर्माण होते त्यामुळे लहान थोरासमोर त्या व्यक्ती एकमेकाचा उध्दार करत असतात, बेअब्रू करीत असतात याचे मार्मिक दर्शन ` प्रायश्चित ` या कथेत पाहाव्यास मिळते.

माणगांव या खेडयात राहणाऱ्या हरभटाच्या घरासमोर पडलेले देवाळ्याच्या जागेतील वडाचे झाड कोणी काढावे यावरुन गावकऱ्यांत व हरभटात बाचाबाची होते. ही बाचाबाची तांदळाच्या विषयावरुन निघते. म्हणजे देवासमोरील तांदूळ हरभट घेतात मग झाड त्यानेच काढावे असे पंच म्हणतात त्यासप्रत्युत्तर देताना हरभट देवाळ्यावरील मंगलोरी कौले कोणी नेली, पायरीचा सुळक दगड कोणाच्या

उंब-याला आहे, देवळाचे खांब कोणी लांबविले,देवळाच्या मालकीचा हंडा कोठे गेला, मोठे जाजम कोणी पळविले. या सर्वगोष्टी उघडकीला आगतो. इतकेच नव्हे तर कोणी कोणाला कशी नेली, वयात न आलेल्या मुली कोणत्या पोरांनी कशा वयात आणल्या या सर्वांचा पाढा वाचायला त्याने सुरुवात केल्यामुळे तेथे शेवटी कोणीच शिल्लक राहत नाही व दुस-या दिवशी सर्वजण कोयता,कु-हाडी घेऊन झाडाची तोड करु लागतात.

गावचे लोक एखाद्या गरीबाला कसे लुबाडतात व ठकास एखादा महाठक भेटल्यानंतर ते सरळ सुतासारखे कसे होतात याचा उत्कृष्ठ नमूना म्हणजे ही कथा होय.

भांडणे मग ती गावातील व्यक्तीव्यक्तीमधली असो वा घरातील व्यक्ती - व्यक्तीमधील असो शेवटी वाईटच . कुटूंबातील दोन मुख्य घटक म्हणजे पती - पत्नी. कधी कधी यादोन घटकामध्ये एखाद्या क्षुल्लक कारणावरुन भांडणे होतात. त्यामुळे कौटुंबिक जीवन पूर्णपणे विस्कळीत होते. एकमेकाना मानसिक कोंडमारा सहन करावा लागतो या सर्व गोष्टींचा प्रत्यय घडविणारी कथा म्हणजे 'नास्तिक' होय.

प्रो.काळे व त्याची पत्नी देवकी यांच्यात एखाद्या क्षुल्लक घरगुती कारणा-वरुन भांडण होते. त्यामुळे देवकी मुंबईतील घरातून निघून जाण्याचे बोलते, तर प्रो. काळे व्याख्यानासाठी म्हणून घरातून बाहेर पडतात. ते नास्तिक असल्यामुळे देवाचे दर्शन घेणे त्याना आवडत नाही. त्याना कळत नव्हते ते हे : की लोक बलिदान किंवा आत्महत्या कां करतात ? देवाकडे धाव का घेतात ? देव हा माणसाने निर्माण केलेला अहंकार .बाकी काही नाही ।"[१८] पण घरातील कौटुंबिक वादामुळे त्याचे मन अस्थिर असते. म्हणूनच पंढरपूरच्या विठ्ठलाचे देऊळ, तेथील मूर्त्या पाहत असताना त्यांना तिचीच आठवण येत असते. आपण भांडलो ही चूक केली गावाला जाताना भांडलो हे तर साफ चुकले असे त्यांना वारोवार वाटू लागते पण देवकीनेच भांडण काढले मग तिने माघार का घेऊ नये आपणाच का घ्यावी असे अहंकारी मन उफाळून उठे.पण ते तात्काळ नष्ट होई. असे त्याच्या मनामध्ये विचारांचे वादळ सुरु होई. अनेक आठवणींच्या गाठोड्यातून एकेक आठवणी स्मृती पटलावर तरंगू लागत. त्याचे

लग्न, तिचा स्वभाव, तिची गुलाबाची आवड सारे सारे त्याच्यापुढे थैमान घालू लागते त्यामुळे तो अधिकच अस्वस्थ होतो त्याचा चेहरा वेदनेने कळवळतो. त्याला विलक्षण दु:ख होते व डोळे भरून येतात. त्या भरलेल्या डोळ्यांनी ते समोरील विठ्ठलाच्या मूर्तीकडे पाहतात व असेच जाऊन मूर्तीचा चक्काचूर करावा असे त्याना वाटते.

हा मनातील कोंडमारा कधी कधी आपल्या सख्या भावाच्या बदफैली वर्तनानेही निर्माण होतो. ' गावाकडे ' ही कथा हेच सांगते.

एका गरीब घराण्यात जन्माला आलेला पण स्वत:च्या कर्तबगारीमुळे पुढे गेलेला जिद्दी राजा काळे आपल्याच भावाच्या बदफैली वर्तनाने अस्वस्थ होतो. गावाकडून तशी पत्रे त्याला येतात व तो आणखिनच अस्वस्थ होतो. गावाकडे येताना गाडीतच त्याच्या मनाचा बांध फुटतो तो आपले दु:ख ओकून मोकळा होतो. आपल्या खिशातील पत्रे गाडीतील लोकांपुढे दाखवून ' ही पत्रं पहा । आता गावकरी मला पत्र धाडू लागले आहेत. जसा काही भावाच्या वागण्याला मीच जबाबदार आहे. मोठा भाऊ झालो ना। ' [१९] असे म्हणून अश्रू ढाळतो. गावी गेल्यावर आपल्या भावाचे सर्व कृत्य तो पाहतो. त्याची दशा, त्याचे हॉटेलातील कपबशा विसळण्याचे काम, एका बाई बरोबर असलेली त्याची मैत्री या सर्व गोष्टींमुळे तो अस्वस्थ होतो. त्याला भडभडून येते व सर्वांच्या सर्व भावापुढे ओकून मोकळा होतो' आणि दु:खाचा उमाळा सहन न होऊन राजा ढसढसा रडू लागतो. पैसा मिळविण्यासाठी सोसलेला ताण केलेली धडपड-कष्ट-पैसे उपटण्यासाठी लोकांनी केलेली मैत्रीची ढोंगे - नातलगांनी सांगितलेली खोटी नाती - सगळं दु:ख त्याच्या हृदयात दाटून आले. आंतून आंतून कढ येऊन त्याचे सगळे शरीर हुंदक्यांनी हलू लागले इतके की, तो भावाचे दु:ख निवारायला आला होता की स्वत:चे हे कळणे कठीण होते.' [२०]

प्रत्येक व्यक्तीला आपण मोठे व्हावे, सुखी व्हावे, आपल्याला ऐशआराम मिळावा असे वाटत असते. त्यासाठी ती व्यक्ती धडपडत असते. फक्त आपल्या मूलभूत गरजा भागल्या म्हणजे माणूस सुखी होतो असे नाही. पण सुखी होण्यासाठी आपले कुटुंब लहान असणे अतिशय महत्वाचे आहे पण याची जाणीव ग्रामीण भागात राहणाऱ्या बऱ्याच लोकांना नसते. त्यामुळे घराघरात पोरांचा पसारा पाहावयास

मिळतो. याची जाणीव करुन देणारी मोकाशींची कथा म्हणजे 'आठव्या मुलाचा जन्म' ही कथा होय.

खेडी शहरापासून दूर असल्यामुळे खेड्यातील लोकांना अनेक गोष्टीपासून वंचित राहावे लागते. स्त्रियांच्या बाळंतपणाची तर फार गैर सोय होते. कारण रुग्नालये शहरात असल्याने सर्व सोई तेथेच असत तेव्हा बाळंतपणाचे काम बऱ्याच वेळेला खेड्यातीलच एखादी सुईण करी.दशरथाची बायको कौशल्या हीही त्याला अपवाद नव्हती. ती आपल्या आठव्यांदा होत असलेल्या बाळंतपणातील वेणांच्या कळाने असह्य होत होती. बाळंतिणीकडे जसे लक्ष द्यायला हवे तसे तिच्याकडे लक्ष न दिल्यामुळे तिचा चेहरा पूर्णत: सुकून गेला होता. ती वेदनेने थकली होती. तिच्या डोळ्यामोवती काळी वर्तुळे जमा झाली होती. हातपाय वाळलेले होते व एका काळोख्या खोलीत ती तडफडत पडली होती. तिची अशी अवस्था पाहून दशरथ दु:खी होत होता. त्याच्या मनात दया येऊन आपण शहरात जाऊन एखादी नर्स आणावी असा विचार त्याच्या मनात येतो. शेवटी तो विचार आपल्या आईला बोलून दाखवितो पण तिला तो अपमान वाटून ती त्याच्यावर ओरडते पण कौशल्येच्या ओरडण्यामुळे तो घायाळ होतो व मनाचा धीर करुन शहरातून नर्स आणण्यासाठी तो सावकाराकडे त्याची गाडी मागण्यासाठी जातो. या अडचणीच्या वेळी मदत करणं हा माणुसकीचा धर्म असला तरी तो धर्म बऱ्याचवेळा पाळला जातोच असे नाही गण, सावकारही त्याला अपवाद नव्हता.सावकार आपल्याला गाडीची गरज आहे असे सांगून दशरथला गाडी देण्याचे नाकारतो. त्याची स्वत:ची गाडी असते पण धावा लावण्यासाठी लोहाराकडे टाकलेली असल्यामुळे तो पैशाशिवाय ती चाके हालवू देत नाही. त्यामुळे तो दु:खी होतो व दु:ख विसरण्यासाठी दारु पितो. नशेतच शहराकडे नर्स आणण्यासाठी निघून जातो व रस्त्याकडेला रात्रभर बेशुध्द होऊन पडतो. सकाळी उठून घरी येतो तो त्याला पत्नी व्यवस्थित बाळंत झाल्याचे समजते.मुलाच्या रडण्याचा आवाज कानावर येताच तो गहिवरुन येतो व 'आई ऐकते आहेस ना ? अगदी कौसल्येसारखाच आवाज आहे, नाही ?' असे आपल्या आईला म्हणतो.

खेड्यातील लोकांचा खेडूतपणा, स्वार्थीपणा, अशिक्षितपणा याचे दर्शन घडविणारी ही कथा आपल्याला वेगळ्याच विश्वात घेऊन जाते.

मानवी इच्छा, वासना, स्वार्थीपणा हा जसा खेड्यातील लोकांत पहावयास मिळतो तसाच शहरात राहणाऱ्या व्यक्तीमध्येही पाहावयास मिळतो `वास्तु` ही अशीच त्यांच्या उत्तम कथा पैकी एक कथा आहे.

कथेतील `मी` स्वत:ची वास्तू हवी म्हणून एका जमीनीच्या तुकड्यावर वासना करीत असतो. तेही तो ज्या वाटेवरुन फिरायला जातो त्या वाटेवर असलेली ही वास्तू दुसऱ्याची असून सुध्दा त्याच्या मनात भरते व त्या वास्तूवर घर बांधावे असे तो ठरवितो. त्या जागेवरुनच तो फिरायला जात असल्यामुळे त्या जागेची स्थित्यंतरे तो पाहात असतो पण जेव्हा त्या जागेवर दुसऱ्याचे घर उभे राहते तेव्हा `मी` ला वाईट वाटते. त्याला वास्तूशांतीचे आमंत्रण मिळाले असल्यामुळे नाईलाजाने त्याला वास्तूशांतीला जावे लागते पण स्वत: `मी` वासनाचक्रात सापडलेला असल्यामुळे त्याला दरदरुन घाम फुटतो. पाय लटपटू लागतात. त्यामुळे त्याला तेथून काढता पाय घ्यावा लागतो. ही कथा आत्मकथनपर आहे. आणि विषयातील जिव्हाळा पाहता कथानिवेदक `मी` खुद्द मोकाशीच वाटतात.

आपल्या भारत देशात पूर्वीपासून आजतागायत भेडसावत राहणारा आणखी एक जिवंत प्रश्न म्हणजे बेकारी. सर्वांची झोप उडविणारी, जीवन उध्वस्त करणारी विषारी नागीण म्हणजे बेकारी ही बेकारी बऱ्याच जनांना सतत सतावत असते" `अकृत` कथेतील `मी` ही त्याला अपवाद नाही.

`अकृत` कथेतील मी हा बेकार तरुण बेकारीने त्रस्त झाल्यामुळे भटकणारा, उनाडक्या करणारा, गावभर भटकणारा, रात्रंदिवस काम करुनही घरातील माणसांना मिळणाऱ्या तुटपूंजी पगारामुळे उद्योग करण्यास नाखुषा असणारा `मी` उद्योग न करता गावात भटकत असतो. खिशात पैसे नसतानाही बोगस नाव सांगून सायकल भाड्याने काढून गावभर फिरवितो व ती विकून आलेल्या पैशात चैन करतो.

हुंडा देणं व घेणं ही समाजाला लागलेली कीड आहे ही कीड आजची नाही तर ती फार प्राचीन काळापासूनची आहे. आज हुंड्याच्या रुपाने सोने, पैसा दिला घेतला जातो पण प्राचीन काळी हाच हुंडा वेगळ्या पध्दतीने म्हणजे गायीच्या रुपाने दिला घेतला जात होता `पाच हजार गायी` ही दि.बा. मोकाशींची कथा त्याचेच प्रतीक आहे.

देगावकर इंजिनिअर असूनसुध्दा हुंड्याचा प्रश्न त्यानाही भेडसावत राहतो. त्यासाठी त्याना अगदी वृध्दापकाळीही तिसऱ्यांदा नोकरी पकडावी लागते. पासष्टाव्या वयात त्याची शेवटची मुलगी लग्नाला आली होती. तिसरी नोकरी शोधताना एका मित्राला ते म्हणत होते " नोकरी शोधतोय बाबा । कण्वऋषीपासून आजपर्यन्त कन्येच्या लग्नाला अडचण तीच आहे. पाच हजार गायी ।"[२१] हुंड्याचा प्रश्न मुलीच्या कोणत्याच बापाला सुटला नव्हता. कण्वाच्याकाळी नवरा मुलगा पाच हजार गायी मागत होता, तर आजचा नवरा मुलगा पाच हजार रुपये मागत होता. शिवाय वरखर्च. सध्याच्या महागाईच्या दिवसात व वाढत्या गरजांच्या काळात इतके रुपये मिळविणे सोपे नव्हते. म्हणूनच देगावकरांना या वयातही तिसऱ्यादा नोकरी पकडावी लागते. आणि तीही इच्छा नसताना. प्रसंगी मानहाणीसुध्दा सहन करावी लागते. त्यामुळे कानात गुणगुणल्यासारखे शारीरिक आजार वळावत चालले होते. पण मुलीच्या लग्नासाठी पैसा हवा होता म्हणून ते सर्व सहन करीत होते.

हुंड्याप्रमाणेच आणखी एक प्रथा तत्कालीन समाजात प्रचलित होती ती म्हणजे जरठकुमारी विवाह ही होय. ही समस्या मोकाशी आपल्या ' मुरली ' या कथेद्वारे सांगताना दिसतात.

वयाच्या चाळीशीपर्यन्त सांगून आलेल्या अनेक मुली वेगवेगळी कारणे दाखवून व वेगवेगळ्या शंका कुशंका घेऊन नाकारणारा मुरली वयाच्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी बोहल्यावर उभा राहतो तेही अठराव वर्ष ओलाडलं असेल नसेल अशा मुली बरोबर आणि मग दोघांच्या वयामधील दरीसारखीच विचारामध्येही दरी राहते. तिनं जरा आत बाहेर केलं की, " सारख्या आत बाहेर काय करता ? तिऱ्हाईत माणूस आल्यावर सारखं बाहेर येणं वाईट दिसतं. कुळाचाराला हे सोडून आहे. मुलांना हेच का वळण लावणार तुम्ही ? जरा प्रौढ व्हा "[२२] असा तिच्यावर प्रौढत्वाचा संस्कार करु लागतो. प्रौढ बोलणे, नऊवारी लुगडे नेसावयास लावणे, केसांचा शेपटा न सोडणे, प्रौढत्वासारखे वागवणे, तिला प्रौढत्वाची जाणीव व्हावी म्हणून अहो जाहो म्हणणे या सर्व गोष्टीमुळे तिच्या बाल्मनावर, स्वातंत्र्यावर बंधने पडतात व ते सर्व असह्य होऊन ती वायरमनाबरोबर पळून जाते.

गुंड, चोर, दरोडेखोरांचा सुळसुळाट असलेल्या मुंबई नगरीत बऱ्याचवेळा चोर

संन्याशालाच शिक्षा व मार मिळतो. त्यामुळे निरपराध माणसांना शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागतो. `पाकिटचोर` ही कथा हेच सांगते.

विनोद कासेगावकर हा एका स्टेशनमास्तरांचा नाकासमोरील जीवन जगणारा साधा सरळ मुलगा. मुंबईत तिजोऱ्या बनविणाऱ्या कारखान्यात कौशल्य पणाला लावून मॅकॅनिक म्हणून काम करत असतो. लग्नाच्या बाजारात मुलीबद्दल साध्या अपेक्षा बाळगून उभारतो. पण जी मुलगी तो पसंत करतो तिचे वडील मुलीसाठी बिऱ्हाडाला तीन खोल्यांचा ब्लॉक देण्याचा विचार बोलून दाखवितात.

लग्न ठरल्यानंतर तो आपल्या भावी पत्नीला भेटण्यासाठी रोज सायंकाळी जात असतो ? नऊ दहाच्या दरम्यान खोलीवर परतत असतो. तिचा स्वभाव, तिची आपल्या विषयीची काळजी, तत्परता त्याला आवडते. एक दिवस भावी सासुरवाडीत जाण्यासाठी तो दादरला उतरतो तोच त्याला चोर समजून सर्व लोक बडवतात. `मी चोर नाही` हे त्याचे ओरडणे कोणीही ऐकून घेत नाही. रेल्वे पोलिस त्याला ऑफिसात घेऊन जातात तेव्हा स्टेशनमास्तर समोर `साहेब मी पाकीट चोरल नाही - मी चोर नाही`[23] असे ओरडून सांगणाऱ्या विनोदची सभ्यता त्यांना न समजून तेच त्याच्यावर खेकसतात व त्याला लॉकअप मध्ये बंद करतात. दुसऱ्या दिवशी त्याच्या वडिलांमुळे त्याची सुटका होते. तो तेथून येत असताना त्याच्या मनात अनेक विचार येतात. आपल्याला लोक काय म्हणत असतील, आपण चोर नाही हे आपल्या भावी पत्नीला पटेल का ? या विचारांनी तो दुःखी होतो त्याचा सर्व उत्साह नष्ट होतो. तिला भेटण्याचेही तो टाळू पाहतो. आपण खरी वस्तुस्थिती तिला पत्राने कळवावी असे वाटूनही तो पत्र लिहू शकत नाही मात्र एक दिवस तीच त्याचा शोध घेत येते व तिच्या गोड बोलण्याने व सुखद स्पर्शाने तो पुलकित होतो व आपल्यावरील चोरीच्या आळाचे, लोकांच्या माराचे, कोठडीतल्या रात्रीचे प्रसंग क्षणात विसरून जातो.

भारतामध्ये दारिद्र्य सर्वत्र संचार करताना दिसते ते काहींना जन्मतःच लाभते तर काहींना परिस्थितीने लाभते. परिस्थितीने त्रस्त झालेल्यांना पोटाची खळगी

BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

भरण्यासाठी भिक मागितल्याशिवाय पर्याय नसतो. 'मायबाप' कथेतील नामू हा असाच परिस्थितीने लाचार बनलेला आहे. निकामी एक हात व लुळा पडलेला पाय त्याला भिक मागायला प्रवृत्त करतात. कर्तृत्व करण्याची मनिषा असताही परिस्थिती त्याच्या आड येते व भिक मागून खाणेच त्याच्या वाट्याला येते.

समाजामध्ये परिवर्तन होते. आजूबाजूची परिस्थितीही बदलत असते पण नामूचे भीक मागणे सुटत नाही. समोरच्या आवारात असलेले मोडके घर पाडून उभारलेल्या बँकेच्या इमारतीमध्ये अनेक प्रकारचे, अनेक थरातले लोक येता-जाताना नामू पाहात असतो. त्यामुळे त्याला आपले पूर्वीचे कर्तृत्व आठवून दुःख होते. तो नेहमी तेथेच भिक मागून खात होता. बँकेत येणारी नवी जुनी माणसे तो पाहात होता. त्यामुळे माणसे ओळखायलाही तो शिकला होतो. बँकेत होणाऱ्या दरोड्याची जाणिव त्याला अगोदरच झाली होती म्हणून तो त्याच्यावर पाळत ठेवून होता. एक दिवस गाडीतून उतरलेल्या एका दरोडेखोराने नामूला धमकी दिली व आपण उद्या येणार आहोत चोरी केल्यानंतर कारचे दार उघडून आम्हाला मदत कर असे फर्मावले. नामू घडलेले सर्व बँकेत जाऊन साहेबांना सांगतो. दुसऱ्या दिवशी बँकेत दरोडा घालून मोटारीकडे येणाऱ्या दरोडेखोरांना मदत न करता नामू दरवाजाला उभा राहतो. त्याच्या हातावर पिस्तूलाने वार करून आत घुसलेल्या ड्रायव्हरवर हल्ला करतो. मोटर भिंतीवर आपटते तेव्हा त्यातून बाहेर पडून थैली नेणाऱ्या इसमावर नामू झेप घेतो चाकूचा हल्ला झाल्याने नामू बेशुध्द होतो पण दरोडेखोराला पकडले जाते. नामू हॉस्पिटलमध्ये शुध्दीवर येतो. साहेब त्याला बक्षीस देण्याची भाषा बोलतात 'साहेब' मला फक्त नामदेव व्हायला हवय. एव्हढे तो म्हणाला नाही पण त्याच्या चेहऱ्यावर ते आले.' [२४] मॅनेजर बँकेत नोकरी देण्याचे आश्वासन देतात. तेव्हा नामूच्या मुखावर त्याही अवस्थेत हासू तरळते.

हेच दारिद्र्य कधी कधी माणसाला चोरी करण्यास प्रवृत्त करते 'सुटका' कथेतील बारामतीकरांनी हाच मार्ग स्वीकारला. दारिद्र्यामुळे होणारी कौटुंबिक ओढाताण, संसाराचा गाडा ओढताना होणारी परवड थांबविण्यासाठी बँकेत काम करणारे बारामतीकर पन्नास हजाराची चोरी करतात व दहा वर्षांची शिक्षा भोगण्यास तुरुंगात जातात. आपल्या मुलांचे शिक्षण, बायकोची ओढाताण थांबविण्याचा उदात्त हेतू त्यांच्या डोळ्यासमोर होता. पण दहा वर्षांची शिक्षा भोगून परतताना

आपल्या मुलाने आपण घरी येत आहोत असे समजताच वेगळे वि-हाड थाटलेले समजताच तो खिन्न होतो त्याच्या मनात अनेक विचार येतात. ज्यांच्यासाठी आपण सर्व सहन केले त्याना आपला बाप तुरुंगात होता हे सांगण्याची लाज वाटते या विचाराने निराश होऊन तो घरी परत न जाता परस्पर दूर जातो.

मोकाशी वरील कथेतून घरातील दारिद्र्याचे जसे वर्णन करतात तसेच तुरुंगातून सुटून आलेल्या व्यक्तीविषयी समाजाची कशी धारणा होती हेही व्यक्त करतात. अशा बापाच्या मुलाला मुलगी देण्यास कोणीच राजी नसतो. बारामतीकर तुरुंगात असताना त्याची पत्नी 'मुलाचं लग्न करायचं' असे लिहित होती पुढचं न लिहिता कळत होतं मुलाचा बाप तुरुंगात होता. कुणी मुलगी देत नव्हतं ते ओळखून गरजू मुलाचा बाप शोध असं आपण लिहिलं'[२५] असे ते लिहितात यावरुन समस्या किती भयानक होती हे समजू शकते.

कधी कधी ड्रायव्हरच्या जीवनातही अशा काही समस्या निर्माण होतात की त्याना घराकडे लक्ष देणे मुष्कील होते. 'लॉरी' ही कथा हेच व्यक्त करते.

ड्रायव्हरला सतत कोठे ना कोठे तरी कामासाठी जावेच लागते. अमूक या वेळी व अमूक या दिवशी घरी येऊ असे ठामपणे त्याला सांगता येत नाही. ब-याच दिवसांनी घरातील मंडळींना पोटभर भेटण्याची व बोलण्याची उसंत त्याना मिळत असते. तेवढेच सौख्य त्यांच्या वाट्याला असते. पण कधी कधी एखाद्या साधूकडे जा अंगारा घे आपल्या आयुष्याबद्दल ,बहिणीच्या लग्नाबद्दल साधूला विचार अशा गोष्टीही ते करतात. त्यावर त्याचा विश्वास असतो हे बहिणीच्या लग्नाच्या वेळेला महाराजांना मी विचारुन गेलो होतो त्यांनी सगळं उत्तम होईल म्हणून आशिर्वाद दिला होता'[२६] या उद्गारावरुन व्यक्त होते.

साधूवर असलेला विश्वास, तरुणांच्या मनात चाललेल्या किडलेल्या मनाचे दर्शन व मित्रत्वाच्या नात्यामुळे भारावल्याने आपली बहीण ड्रायव्हर मित्राला देणारा उदार मित्र अशा वेगवेगळ्या गोष्टींचे दर्शन या कथेतून घडते.

समाजात ख-याचे खोटे व खोट्याचे खरे करणा-या माणसांना तोटा नाही. खोट्याचे खरे करुन आपली पोळी भाजून घेणारी माणसे पुष्कळ आहेत 'आजची म्हैस' ही कथा हेच व्यक्त करते.

शहरात असलेल्या आपल्या नातवंडांना न मिळणाऱ्या दुधामुळे दुःखी झालेली आजी वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षी म्हैस घेते पण तिच्या मृत्यूने तिची इच्छाअपूर्णच राहते. मरणापूर्वी तिने ज्याला म्हैस विकलेली असते त्याने आजीला पैसे न देता ही पैसे दिले असे लेखकाला सांगितलेले असते. लेखक ज्या दिवशी गावी येतो त्याच दिवशी रात्री म्हैस वेड्यात उभी असलेली दिसते. तिची कास दुधाने भरलेली असते. लेखकाची पत्नी व लेखक दूध काढतात तोच म्हैस घेतलेली व्यक्ती येते व आपण म्हैस घेतली पण पैसे न दिल्याचे कबूल करते कारण म्हैस सुटून आल्यानंतर तिच्या मागोमाग जेव्हा तो येतो तेव्हा म्हैशी बरोबर त्याने म्हातारीला पाहिलेले असते व त्याच नवलाने तो गर्भगळीत झालेला असतो. शेवटी आपली चूक तो मान्य करतो व पैसे आणून नंतर म्हैशीला घेऊन जातो.

माणसासमोर अनेक समस्या क्षणाक्षणाला जबडा पसरून उभ्या असतात. धीरानं व जिद्दीनं त्या समस्या निराकरण करण्यातच माणसाचं कर्तृत्व असतं. मृत्यू हा अटळ आहे. प्रत्येकाच्या वाट्याला तो येतो. पण नैसर्गिक मृत्यू येणे वेगळे व अनपेक्षित हत्यासारखा मृत्यू येणे वेगळे. एखाद्याची हत्या झाली तीही हिंस्त्र जनावराकडून तर माणूस हळहळतो. घाबरतोही व आपला जीव वाचविण्याचा प्रयत्न करू लागतो. वाघासारख्या प्राण्याचे आगमण जरी झाले तरी लोक आपला जीव वाचविण्यासाठी घरे दारे बंद करून जीव मुठीत घेऊन बसतात पण कधी कधी त्याला नष्ट करण्याचाही प्रयत्न करतात 'हाका' ही कथा याचेच एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

अवचित आलेल्या वाघानं घरात असलेल्या आपल्या व बायकोला ओढून नेल्याचे समजताच जाधव मिस्त्री बोंबाबोंब करतो व त्याला सामोरे न जाता जो तो स्वतःला चार भिंतीच्या आत कोंडून घेतो पण सर्वच पळपुटे असतात असे नाही. काही शूरवीरही समाजामध्ये असतात असे तरुण वीर वाघाच्या मार्गावर जाऊन वाघाकडूनच तिची हत्या झाल्याची खात्री करून घेतात. मानवी हत्या करणाऱ्या क्रूर वाघाला नष्ट करण्यासाठी शिकाऱ्याला बोलावून वाघाला उठविण्याचे काम हे हाके करतात. भर उन्हाचे चटके सहन करत, करवंदीच्या काट्यांच्या वेदना सहन करत हाके वाघाला शोधून काढतात. शिकारी अचूक वाघाला टिपतो व गोळीने मेलेल्या वाघाचा प्रचंड धूडाची गावातून मिरवणूक काढली जाते.

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा पगडा खोलवर बसलेला आहे. त्या वर्णव्यवस्थेनुसार कामाची विभागणी केलेली पहावयास मिळते. त्यामुळे सामान्य माणूस व सरंजामदार यांच्यामध्ये बरेच अंतर दिसते. सरंजामदारांच्या रूढी परंपरेचे दर्शन घडविणारी 'गोरी घारी मामी' ही एक चांगली कथा आहे.

एका गरीब घरात जन्माला आलेली व सावत्र आईच्या जाचाला कंटाळून घरातून पळून गेलेली व नंतर सरंजामदाराची झालेली पत्नी म्हणजेच 'गोरी घारी मामी' सावित्री. दिसायला सुंदर असल्यामुळे सरंजामदाराच्या नजरेत ती भरते व त्याची सून म्हणून गढीत येते. लग्नानंतर तिचा गृहप्रवेश पालखीतून होतो. गढीचे प्रचंड महाद्वार शिंग वाजवून उघडते. ती सांगते, "मी पालखीत असताच शिंग वाजले व दार हळूहळू उघडू लागले जणू स्वर्गाचे द्वार उघडत होते"[२७] गढीच्या परंपरेचे व रीतीरिवाजाचेच हे द्योतक आहे. गृहप्रवेश करताना तिच्या डोक्यावर सोन्याची फुले उधळली जातात. तिने लोटलेले मापही सोन्याचे असते.

वाड्यात वैभव होते पण कोणतीही स्त्री घरातून बाहेर पडणे परंपरेविरुध्द होते म्हणूनच घरातून पळून गेलेली मामीची चुलत नणंद पकडून तिला काळोख्या खोलीत टाकले जाते. मामीही तसाच प्रयत्न करते पण तो फसतो त्यामुळे तिच्यावर ओढवले असते ते संकट टळते. एक दिवस वाड्यावर दरोडा पडतो. वाडा लुटून तो पेटविला जातो व त्यानंतरच मामी लेखकांच्या घरात येते .

ही कथा जशी समाजातील काही प्रतिष्ठित घराण्याच्या रूढी-परंपरा व्यक्त करते तशीच सावत्र आईच्या आगमनाने होणारी निष्पाप मुलांची ससेहोलपट प्रकट करते. इतकेच नव्हे तर दरोड्यासारख्या टोळधाडीने उध्द्वस्त झालेले संसार व त्यामुळे झालेली केविलवाणी अवस्थाही व्यक्त करते.

काही गोष्टी व्यक्तीला, कुटूंबाला, समाजाला प्रतिष्ठा प्राप्त करून देतात, किमान तसे आपण समजत असतो. दूर सहलीला जाणे, एखाद्या थंड हवेच्या ठिकाणी जाणे या सारख्या गोष्टींनी प्रतिष्ठा मिळाल्यासारखी वाटते 'हवा खाण्याचे ठिकाण' ही कथा हेच दर्शविते.

नारायणरावांच्या कॉलनीत राहणारी कित्येक कुटूंबे याच प्रतिष्ठेसाठी

कर्ज काढून माथेरानला जाऊन येतात. टॅक्सी कॉलनीतील आपल्या घरासमोर उभी राहिल्यावर सर्वांच्या नजरा आपल्याकडे लागलेल्या आहेत याची जाणीव होऊन तीच आपल्याला प्रतिष्ठा मिळाली असे सर्वांस समजतात. या सर्वांचा परिणाम होऊनच नारायणाच्या कुटुंबानं माथेरानला जाण्याचं त्याच्यावर लादलेलं असतं.

माथेरानला जात असताना लेखकाच्या पूर्वस्मृती जागृत होतात.आपले गाव, माथेरानला पोट भरण्यासाठी जाणारे गावातील हरिजन,माथेरानला जाताना व घर खर्चासाठी लागणारा पैसा नेण्यासाठी नारायणरावांच्या वडिलांकडे आलेले पण काही न बोलता घुटमळणारे म्हार, हे सर्व चित्र डोळ्यासमोर तरळत असता इतक्या दिवसाने ती आपल्याला ओळखतील का ? असे लेखकाला वाटते.

अशा ठिकाणी खर्चाला तोटा नसतो. क्षणा-क्षणाला कोणतीही गोष्ट करताना पैसा मोजावा लागतो.आणि असे असूनही लोक माथेरानला जायचे काय सोडत नाहीत.

प्रेम हे माणसाला लाभलेले वरदान आहे. प्रेम म्हणजे दोन भिन्नलिंगी जीवांचे मनोमीलन पण अजूनही समाजात प्रेमाला किंमत नाही. एखाद्याने प्रेम केले तर लोक एखाद्या गुन्हेगारासारखीच त्याला वर्तणूक देतात. घरातील लोकही प्रतिष्ठेसाठी धडपडत असतात. त्यामुळे प्रेमविवाह होणे मोठे दिव्य केल्यासारखे वाटते.पण काही काही वेळेला प्रेमाची व्याख्या नीट न समजल्यामुळे मोठा गोंधळ झालेला पहावयास मिळतो.शारीरिक आकर्षणापोटी एकत्र आलेल्याना ते प्रेम वाटते त्यासाठी ते आत्महत्यासुध्दा करु शकतात पण ते चिरकाल टिकते असे नाही.जसे जसे दिवस जातील तसतसे ते प्रेम विसरले जाते 'माझ्यावर गोष्ट लिही।' ही कथा याचेच प्रतीक आहे.

प्रेम व प्रेमविवाह यासाठी आसुसलेली रागिणी जेव्हा घरातील लोक व समाज तसे करु देत नाही तेव्हा जीवनाला कंटाळते.घरात आपल्याला कोंडून ठेवणाऱ्या लोकांवर रुष्ठ होऊन एक दिवस लेखकाकडे जाते व आपल्यावर गोष्ट लिहिण्यासाठी लेखकाला विनवते. लेखक त्याप्रमाणे गोष्ट लिहितो व तो सर्वांच्या चर्चेचा विषय होतो त्यामुळे रागिणीचे वडील तिचे लग्न एका अपरिचित व्यक्ती बरोबर लावतात. नाविलाजास्तव तिला त्याच्याबरोबर संसार करावा लागतो.

पण कांही वेळा प्रेम म्हणजे काय याची जाणीव नसल्यामुळे अजाण वयात एखाद्या व्यक्तीच्या प्रेम पाशात अडकलेल्या व त्याच गोष्टीला प्रेम म्हणून थोडा काळ स्वतःला कोंडून घेणाऱ्या, घरातील लोकांनी दुसऱ्या व्यक्तीबरोबर लग्न केल्यावर सुखाने संसार करत असताना आपल्या पूर्व आयुष्यात आलेल्या प्रेमाला पूर्णपणे विसरणाऱ्या मुली समाजात भरपूर आहेत. ' रागिणी ' ही नायिका याच मुलींच्या यादीत बसणारी आहे. म्हणूनच ती थोड्याच दिवसात नवीन संसारात रमल्यामुळे पूर्व प्रेमाला विसरून जाते व सुखाने संसार करू लागते.

मोकाशी आपल्या सामाजिक कथेतून तत्कालीन समाज, सामाजिक परिस्थिती, समाजातील पारंपारिक रुढी, परंपरा त्यामुळे समाजात वावरणाऱ्या व्यक्तींचे बनलेले व्यक्तिमत्व या सर्व गोष्टींचे चित्रण अगदी बारीक सारीक तपशीलाने करताना दिसतात. समाजातील व्यक्तींच्या स्वभावातील गुण दोष ठळकपणे चित्रित करतात. त्यामुळे कथातील बऱ्याच व्यक्ती हुबेहूब साकारलेल्या आहेत.

क) प्रेमकथा --

मोकाशी आपल्या कथातून मध्यमवर्गीयांच्या जीवनाचे वास्तववादी चित्रण करीत असताना त्याची काव्यात्मताही त्या वास्तवातूनच उमललेली दिसते. स्त्री - पुरुषांचे तरुण वय, त्याना वाटणारं परस्पराच आकर्षण, त्यांच्या जीवनातील काही सामान्य गोष्टी यामुळे त्याच जीवन फार सुंदर आणि अर्थपूर्ण करून टाकतं, हे आपल्या काही प्रेमकथांतून मोकाशी मोठ्या उत्साहान व क्वचित विनोदानंही दाखविताना दिसतात.

प्रेम या विषयावर मोकाशींनी बऱ्याच कथा लिहिल्या आहेत. परंतु अश्लिलतेचा वापर न करता भावूक हृदयस्पर्शी संवादातून ही कथा फुलत जाते.

' लेणी ' या कथेत जुन्या पुरातन गावात गुहेत खोदलेली जुनाट लेणी पाहण्यासाठी गेलेला प्रियकर व प्रियसी ( सुशी ) गुहेत असलेली स्त्री-पुरुषांची कमनीय रुपे पाहताना एकमेकाकडे ओढली जातात व दोघांच्या सुखद सहवासात ती लेणी, ते हृदय सौन्दर्य पाहून स्वतःला हरवलेला प्रियकर संगतीस असलेल्या

प्रियसीचे प्रेमरूप पाहू लागतो. त्या लेण्यातील भोक्ताली नाचणारे मोर, वाजणारा मृदंग, पदुघात करणाऱ्या नर्तकी, बुध्दाचे स्मित, भोक्तालचे रसरसलेले जीवन, हंसाचा विहार, तरुण तरुणीचे प्रणय, पुष्ट कटिबंध रेखीव स्तन, पेदार बलवान नि सुंदर शरीरं, सुरापान करणाऱ्या व्यक्ती हे पाहून ती दोघं त्यातील शृंगारछटा मनोमन अनुभवतात. आणि त्याच वेळी तो अंतर्मुख होऊ लागतो. चैतन्यमय लेणी व त्याच्या शेजारचे सुस्त खेडेगाव यातील विसंगती त्याला जाणवते. मग कथा भूतकाळात हरवते. वर्तमान आणि भूतकाळ एकाचवेळी कथेत वावरू लागतात. मूळ कथेला समांतर कथा तयार होऊ लागते. आणि काही काळ तो आणि ती यांच्यात मानसिक दुरावाही निर्माण होतो.

मोकाशी आपल्या काही कथातून अश्लिलतेचा वापर न करता भावुक हृदयस्पर्शी संभाषणाद्वारे प्रेमकथा रंगवितांना दिसतात. त्याचे सुंदर उदाहरण म्हणजे त्यांची `काय रानटी लोक आहेत` ही कथा होय. पु.ग.सहस्त्रबुध्देही या कथेचे वैशिष्ट्य मानतात.

`शाम` नावाच्या सरळ व सोज्वळ मनाच्या तरुणाची `लता` नावाच्या निरागस मुलीशी ओळख होते तसे दूरचे नातेही निघते. ती त्याच्या घरी वारंवार येते. दोघे कॅरम खेळतात. तो तिला घरी पोहोचवायला जाऊ लागतो. परिचय वाढून त्याचे प्रेमात रूपांतर होते. त्याने पाहिलेली ती पहिलीच मुलगी असते. विशेष म्हणजे त्याला मुली पाहणे आवडत नाही. दोघांचे लग्न ठरते तेही जुन्या पध्दतीने. लग्न विधि व संसाराबद्दलच्या दोघांच्याही वेगळ्या कल्पना असतात. पहिल्या रात्री लोक दोघांना सजविलेल्या खोलीत कोंडून ठेवतात. पण लग्नानंतरची त्यांची पहिली रात्र एकमेकांची ओळख करून घेण्यात, हसत खेळत एकमेकांना समजावून घेण्यात आणि `आपण चांगला संसार करु` असे आश्वासन देण्यात निघून जाते. देह दूर राहिले तरी त्यांच्या मनाचे असे मीलन त्या पहिल्या रात्री होते. त्याना वाटते की, `लोक समजतात तसं आपलं मीलन झालं नसलं, तरी त्याहून अगदी वेगळं असं मनाचं मीलन झालं आहे.`[२८] लग्नानंतर भेटलेली `तो` व `ती` पहिली रात्र अशा प्रकारे अतिशय तरल व भावुक संभाषणात घालवितात. मनाचे हे आगळे वेगळे मीलन घडून भविष्याचे उमदे स्वप्न रंगविले जाते. तेव्हा आजूबाजूची शारीरिक प्रेमावर जगणारी माणसे त्याना रानटी वाटू लागतात. अशी ही प्रेमकथा मोकाशी खुमारदार संवादाची पेरणी करून रंगवितात.

परस्परांवर असलेल्या प्रेमाची जाणिव नसल्यामुळे निरोप देताना तुटक बोलणाऱ्यादोन मनाची एकमेकांवरील प्रेमाची जेव्हा खात्री पटते तेव्हा मनाची आतुरता हुरहूर व्यक्त करणारी व निरोप न देता परस्परांचे झालेले मीलन म्हणजे `निरोप` ही कथा होय.

कथेतील `मी` ला कायमची सोडून गांवी चाललेली त्याची मैत्रीण त्याला ऑफिसमध्ये फोन करुन बोरिबंदर स्टेशनवर निरोप द्यायला बोलावते. तो तेथे येऊन तिला कल्यान स्टेशनपर्यन्त सोबत करण्यासाठी गाडीत बसतो. गाडी सुरु होते. त्यावेळी तिच्या वियोगाची कल्पना मनात येऊन तो दुःखी होतो. तिची बेपर्वाईची उत्तरे पाहून जास्तच खंती होतो. व आपणही वरवर बेपर्वाई दाखवीत प्रवास करतो. त्याचे एकमेकांशी तुटक बोलणे चाललेले असते. प्रश्नही पोकळ असतात. तिच्या वियोगाची कल्पना त्याला असह्य वाटून आपल्या प्रेमावर तो स्ट्र होतो. तिच्या पोकळ प्रश्नावरुन व तुटक बोलण्यावरुन आपल्या विषयी तिच्या मनात तुडुंब भरलेले प्रेम तो ओळखू शकत नाही. पण त्याच डब्यातला एक मद्रासी सहप्रवाशी त्याचे बोलणे ऐकून त्यांना सहज विचारतो की `तुमची बायको वाटतं ही ?` [२९] त्याच्या या अनपेक्षित बोलण्याने तो चमकून तिच्याकडे पहतो. दोघांची नजरानजर होते. दुसऱ्याच क्षणी लाजेने लालबुंद होऊन तिची मान खाली जाते, तो काय समजायचं ते समजतो ति-हाईताला तिचे जे ढोंग सहज कळाले ते अजूनपर्यन्त आपल्याला जरासुध्दा कळू नये ? याचेच आश्चर्य त्याला वाटते व कल्यान स्टेशन येताच तिच्यासह तो खाली उतरतो.

ही मोकाशींची कथा इतकी सरस उतरलेली आहे की ती पुन: पुन्हा वाचली तरीही तिच्यातील गोडी यःकश्चितही कमी होत नाही.

मोकाशी काही काही वेळेला नुकत्याच उमलत असलेल्या बालसदृश्य प्रेमाची कहाणीही अत्यंत सरसतेने रंगविताना दिसतात. `लहानपण आणि मोठेपण` ही कथा याचेच प्रतिक आहे.

मुंबई मध्ये एका शाळेत शिकत असलेला `नाना` त्याच शाळेत शिकत असलेल्या `उषा` नावाच्या एका मुलीच्या प्रेमात पडतो. उषा ही बंगल्यात राहणारी व सर्वसुखसोईंनी युक्त असलेल्या श्रीमंत बापाची मुलगी. मात्र ती जशी सर्व सुखसोईंनी श्रीमंत होती तशीच मनानेही श्रीमंत होती. आपल्या श्रीमंतीचा गर्व

करून इतर मुलीप्रमाणे श्रीमंतीचे पोवाडे गाणारी ती नव्हती. म्हणूनच एका गरीब कुटुंबातील ' नाना ' शाळेतील गँदरिंगच्या निवडणूकीला उभा राहिलेला असल्यामुळे उषाचे मत मागण्यासाठी तिच्या घरी गेलेला असताना ती त्याचे प्रेमाने स्वागत करते व त्याचा पाहुणचारही करते. त्याच्यापुढे एका बशीत चिवडा, लाडू ठेवते व ' सुरुवात करा मी पाणी घेऊन येते. चहा घेताना तुम्ही ?[30] असे विचारून ती आत वळते व चहा आणते. त्याला मुकाट्याने सर्व घ्यावे लागते. तेव्हा पासून त्या दोघांत संबंध येतो. व त्याचे रूपांतर हळूहळू प्रेमात होऊ लागते. दोघे एकमेकाकडे नकळत ओढले जात असतात व एकमेकांच्या घरी जाऊ येऊ लागतात. त्यांच्यामध्ये होणारी संभाषणे, उषाला नृत्याची असलेली आवड, त्यांचे एकमेकाविषयीचे आकर्षण इत्यादी वर्णने मोकाशींनी अत्यंत सुंदर रंगविलेली आहेत व त्यामुळे या कथेत बालसदृश्य प्रेम काव्यात्म रूप घेऊन अलगदपणे अवतरते.

कधी कधी मोकाशी तारुण्यात पदार्पण केलेल्या दोन जीवाचे पहिल्या भेटीतच एकमेकाविषयी कसे आकर्षण निर्माण होते व संभाषणातून ते प्रेम कसे वृध्दिंगत होते याचे चित्रण करताना दिसतात. ' तिची भीती ' ही कथा अशाच प्रथम भेटलेल्या दोन मनाच्या मीलनाची आहे.

या कथेतील ' ती ' व ' तो ' सिनेमा पाहण्यासाठी एकत्र भेटतात. सिनेमाला जातात, सिनेमा सुटताच रस्त्याने चालताना गप्पागोष्टी करतात. त्या गप्पागोष्टीतूनच ती दोघे एकमेकांचा परिचय करून घेतात. दोघांचीही परिस्थिती बेताचीच असते. तो बेकार असतो व ती शिकत असते. या पहिल्या भेटीतच त्यांचे एकमेकाविषयी प्रेम निर्माण होते व दोघे लग्न करून घेण्याची आंतरिक इच्छा प्रकट करतात व अशा पध्दतीने दोघांचे मनोमीलन होते.

या कथेतील नायक व नायिका पहिल्या भेटीतच एकमेकांवरील आंतरिक प्रेमामुळे एकमेकांना समजावून घेतात व लग्नाची आपली इच्छा प्रकट करतात. या कथेत मोकाशींनी प्रेमाचा सहज अविष्कार करून तारुण्यसुलभ प्रेमाचे वर्णन केलेले आहे.

कधी हे प्रेम एखाद्या ग्रामीण भागामध्येही बहरते व ग्रामीण वर्णनांनी त्याला एक प्रकारची अवीट गोडीही प्राप्त होते याचे उदाहरण म्हणजे ' नकोरे आत येऊ केशव ' ही कथा होय.

' सिंधू ' व ' केशव ' ही ग्रामीण भागातील एका खेड्यात वाढलेली व खेड्याच्या मातीचा, निसर्गाचा गंध लाभलेली दोन बहरणारी मनं. सिंधूचे केशववर नितांत प्रेम असल्यामुळे ती त्याच्या घरी जाऊन त्याच्या आईला वाती वळून दे, गंध उगळून दे अशी कामे करीत असते. आपण मुंबईला जाताना केशवची परवानगी घेण्यास विसरत नाही. या तिच्या वर्तनातून केशववरील तिचे प्रेम, प्रेम सुलभ श्रध्दा ओसंडताना दिसते. तिच्याइतकेच त्याचेही तिच्यावर प्रेम असते म्हणूनच मुंबईला जाताना आईने गाडी घेऊन स्टेशनवर येण्यास सांगितले आहे. असे ती म्हणताच तो गाडी घेऊन जातो. आणि ' सिंधू ' मला कोटाचं कापड, धोतर जोडी, तुला दोन पातळं नि काय वाटेल ते - लवकर यायचं हां ' [31] असे तिला सांगतो.

सिंधू मुंबईहून परतताच तो बेधडक तिच्या खोलीत प्रवेश करतो व प्रवासात घडलेल्या प्रसंगामुळे दु:खाकुल झालेल्या सिंधूला आपल्या कुशीत घेऊन तिचे सांत्वन करतो.

मोकाशी केवळ साध्या, सरळ प्रेमभावना व्यक्त करणाऱ्याच कथा लिहितात असे नाही तर प्रीतीभावना पार्श्वभूमिवर ठेवून मुळच्या सत्शील तरुणाची बेकारीमुळे होणाऱ्या ससेहोलपटीची कहाणी ही कसदारपणे रंगवितात. ' अकृत्य ' ही कथा अशीच आहे.

या कथेतील ' मी ' हा निरुपयोगी तरुण एका ठिकाणी नोकरीत टिकून न राहता अनेक उद्योग करीत भटकत जगत असतो. आणि एका सन्मार्गी तरुणीवर लुब्धही असतो. भाड्याची घेतलेली सायकल दिवसभर फिरवून विकून टाकतो व दिवसभर चैन करतो. भाड्याची सायकल घेताना मालकाला आपल्या प्रियसीचा पत्ता दिल्याचे आठवताच गोंधळून जातो व पुढील प्रसंगाची जाणीव होऊन शरमिंदा होतो व आपण होऊन मालकासमोर ' मी तुमची सायकल विकली. मला घेऊन चला ' असे मान्य करतो व त्याच्याबरोबर पोलीस चौकीकडे निघून जातो.

मोकाशींच्या प्रेमकथा आदर्श वाटतात. मार्मिक संवादाची पखरण करुन त्यांनी आपल्या प्रेमकथा फुलविलेल्या आहेत. म्हणून त्या कितीही वाचल्या तरी त्यातील गोडी कमी होत नाही.

ड) <u>बालकथा</u> --

दि.बा.मोकाशी हे लहानमुलातही रमत असत.लहानपण हे सर्वांना हवेहवेसे वाटणारे म्हणूनच `लहानपण बरवे देवा`, मुंगी साखरेचा खा` असे संतानीही सांगितले आहे. मोकाशी तरी त्याला अपवाद कसे राहतील ? त्यामुळेच त्यानी लहानमुलांवर ब-याच गोष्टी लिहिल्या. त्या गोष्टी जशा अद्भुत आहेत तशाच विनोदीही आहेत. जशा रोजच्या प्रसंगातील आहेत तशाच सुसंस्कार करणाऱ्या आहेत. `गुपित`, `जगाच्या कोलांटया`, `अंधारदरी` ही बालकांवर लिहिलेली गोष्टीची पुस्तके महाराष्ट्र पाठ्यपुस्तक मंडळाने प्रकाशित केलेल्या संस्कार वाचनमालेत समाविष्ठ केलेली आहेत.

माणूस अनुभवामुळे शहाणा होतो हे खरे आहे पण काही काही वेळेला काही अनुभव इतके भयानक आणि विद्रूप असतात की त्याच्या आठवणीने अंगावर शहारे येतात. `ठिपका` ही अशीच एक कथा आहे.

एका वाढत्या वयातल्या मुलाला आलेल्या विद्रूप अनुभवाची ही कथा आहे. मुंबई नगराविषयी सर्वांच्याच मनात कुतूहल,भिती असते.मुलेही त्याला अपवाद नाहीत. या कथेतील मुलगा मुंबईला आपल्या मावशीकडे जातो. मुंबईतील जीवन, तेथील, धावपळ,वाहनाची रेलचेल,माणसाची वर्दळ हे सर्वच कसं भव्य दिव्य,त्या सर्व गोष्टीचे त्याला आश्चर्य वाटत असते. आपल्याकडील असलेल्या पत्यावरुन तो मावशीकडे पोहोचतो. तेथे जास्त वेळ न थांबता चित्रपट पाहून आपल्या गावी जावे असा विचार करुन तो घरातून बाहेर पडतो पण चित्रपटाला अवधी असल्यामुळे तो चौपाटीकडे वळतो व तेथेच तो स्वत:ला हरवून जातो. ब-याच वेळाने तो भानावर येतो व सरळ गावी जाण्याचा विचार करुन निघतो पण अल्लाउद्दीनाचा मुलगा` हा चित्रपट पाहण्याचा मोह न आवरुन तो चित्रपट गृहात प्रवेश करतो. चित्रपट सुटल्यानंतर सरळ स्टेशनकडे जातो.जाताना त्याच्या मनात अनेक विचार येऊ लागतात.मुंबईतील चोर-भामट्याविषयी त्याने बरेच ऐकले होते.तो विचार मनात येताच तो भितीने शहारतो तशाच अवस्थेत तो स्टेशनवर येतो पण स्टेशन बंद झालेले असते तो आणखीनच घाबरतो, त्याचवेळी दुरुन भय्या बोलवत असल्याचे त्याला दिसते. म्हणून तो तिकडे जातो.तेथे त्या भय्याजवळ डोळे मिटून पडलेले असताना त्याच्या

शरीरावर शहारे आणणारा प्रसंग घडतो. तो उठतो व स्टेशनच्या फाटकाकडे धावतो तेथे एका हातावर डोके टेकून पायरीवर पडून राहतो.

सुख-आनंदासाठी प्रत्येक व्यक्ती धडपडत असते. पण ब-याचवेळा दु:ख त्याच्या वाट्याला येते. त्यामुळे त्याला जीवनाचाच कंटाळा येतो ते नकोनकोसे वाटू लागते. 'किल्ला' या कथेतील आई वडिलाविणा पोरका असलेला मुलगा असाच आपल्या आयुष्याला कंटाळलेला आहे. पण जगायचं म्हणून तो जगतो, अस्वस्थ होतो, गप्प बसून राहतो पण त्याला पोट गप्प बसू देत नाही. त्यासाठी किल्ला पाहण्यासाठी आलेल्या लोकांना तो किल्ला दाखवून त्या विषयी माहिती देतो व त्यानी दिलेल्या पैशातून आपले पोट भरतो. बाकीच्या मुलांना ही विवंचना नव्हती म्हणून ती मुले आनंदाने खेळायची, बागडायची पण या मुलाला खेळायची इच्छा असून सुध्दा खेळता येत नाही. तो आपल्याच विचारामध्ये असतो. किल्ला पाहण्यासाठी आलेल्या लेखकाला किल्ला दाखवितो व त्या किल्लाबद्दल माहिती देत असतानाच नकळत आपल्या मनातील दु:ख तो ओकून मोकळा होतो. त्याचे दारिद्र्य, गरिबी, पोरकेपण पाहून लेखकाच्या मनात त्याच्याविषयी अनुकंपा निर्माण होते. किल्ला उतरत असताना तो मुलगा जेव्हा खंदकात कोसळून बेशुध्द पडतो तेव्हा त्याच्या विषयीचे अनेक विचार त्याच्या मनात येतात, व त्याला वाचविण्याची, त्याचा सांभाळ करण्याची लेखक त्याचवेळी शपथ घेऊन त्या मुलाला घेऊन ते जातात.

इ) प्राणिजीवनावरील कथा --

दि.बा. मोकाशी यांनी आपल्या कथेतून जसा मानवी मनावर प्रकाश टाकून अनेक पदर उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे तसाच प्राण्यांच्या जीवनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्नही केला आहे. माणसामध्ये जशी पुढारीपणाची चढाओढ असते व त्यातून जसा संघर्ष निर्माण होत असतो तशीच चढाओढ प्राण्यामध्येही असते. व त्यातून संघर्ष निर्माण होताना दिसतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांची 'माजोर' ही प्राणिजीवनावर असलेली कथा होय.

तन्मनाच्या माजोरीने बरबटलेले पुरुषा समाजात जसे आपल्या स्थाना-साठी प्रचंड चढाओढ करतात तसेच माजोरच्या कृतीतून या चढाओढीचे व त्यातून उद्भवलेल्या संघर्षाचे प्रत्ययकारी चित्रण आले आहे.

झाडाच्या आवारातील एका लहानशा आवारात माजोराची मादी आपल्या पाडसाला जन्म देत होती. त्याच ठिकाणी काळा माजोर माजोरी-पणानं उभा होता. आपली मान सरळ ठेवून, फादेफांदेदार, अणकुचीदार, लांबसडक शिंग उगारून त्याची शक्ती दाखवीत तो उभा होता. त्याचे पूर्ण लक्ष कोपऱ्यातील मादीकडे होते. ती कुणाला जन्म देणार ? हेच तो पाहात होता. त्याला नर नको होता. आपल्या कळपात आपल्याशिवाय दुसरा नर त्याला नको होता. म्हणूनच त्याचे सारे लक्ष तिच्याकडे लागले होते. नर झालाच तर त्याची शिंग त्याला हवेत उचलून फेकायला तयार होती. आजपर्यन्त त्याने कळपातील मादीच्या पोटी आलेल्या कितीतरी नरांना मारून टाकलं होतं किंवा बाहेरून एखादा नर कळपात घुसला की त्याला शिंगावर उचलून त्याच्या चिंधड्या केल्या होत्या. किंवा त्याला पिटाळून लावलं होतं. आणि आपलं पुढारीपण कायम ठेवलं होतं. आजही तो तेच करणार होता. म्हणूनच त्याचे सर्व लक्ष त्या मादीकडे लागल होते. शेवटी तिने नराला जन्म दिला. आपल्याला वैरी झाला हे काळ्याटानं ओळखलं. त्याने खूर जमिनीवर घासले. आपली शिंगं मादीला मान खाली करून दाखविली आणि पाडसाच्या रोखाने एकदम झेप घेतली. पण त्याच्यावर लक्ष ठेवून असलेल्या मादीने तात्काळ सावध होऊन त्याचा हल्ला परतवून लावला. माजोराला नाइलाजाने माघार घ्यावी लागली. प्रत्येक वेळी असेच होत होते पण तिच्यापुढे त्याचं काहीच चालत नव्हतं. तिच बछडही आता मोठं होत होतं त्याची शिंगं अणकुचीदार झाली होती. त्याच्या अंगात मस्ती व जोरही भिनला होता. आणि त्याच बरोबर आपल्या हक्काचीही त्याला जाणीव होत होती. माद्यांच्या वाटेला जाणं, खोड्याकरणं, त्यांच्या मागे लागणं, धक्का देणं, चाटणं या सर्व गोष्टी तो करु लागला होता. लहान माजोर आपले एकेक हक्क हिरावून घेत असल्याची जाणीव मोठ्या माजोराला होत होती व त्यामुळ तो त्याच्यावर चिडला होता. त्याच्यावर हल्ला करण्यासाठी तो संधीची वाट पाहात होता. बऱ्याच वेळा आलेली संधी

माद्रीमुळे त्याला झुकावी लागली होती.आणि एक दिवस अचानक मोठ्याने त्याच्यावर हल्ला केला.छोटयाने स्वतःला सावरले व पवित्रा घेऊन मोठयावर हल्ला केला.दोघे एकमेकांना भिडले.डोक्याचे,शिंगाचे,खुरांचे आवाज होऊ लागले. शिंगे एकमेकांना भिडली.शिंगाचा आवाज झाला. आणि मोठ्याच्या शिंगाचे दोन फाटे कडाकड मोडले.छोटयाचे शिंग त्याच्या डोक्यात शिरून रक्त घेऊन बाहेर आले. रक्ताची चिळकांडी उडाली.मोठा धडपडत उठला. त्याच अंग भितीनं कापू लागलं. स्वतःचा तोल सावरीत तो पळू लागला व कोपऱ्यात मान खाली घालून उभा राहिला.आणि तेव्हा पासून छोटा माजोर त्या पूर्ण कळपाचा पुढारी बनला.

पशू व मानव याचे मार्ग जरी भिन्न असले तरी बळी तो कान पिळी हे तत्व दोघांत समान असल्याचे सूचित होते. ' माजोर ' ह्या कृतीतून प्राण्यातील संघर्ष पुढारीपणा दाखविण्याचा प्रयत्न दि.बा.मोकाशी करतात.

## संदर्भ


१ दि.बा.मोकाशी - लामणदिवा - पृ.६
मौज प्रकाशन:८७
दुसरी आवृत्ती,ऑक्टोबर १९६३
२ दि.बा.मोकाशी - लामणदिवा - पृ.६
३ -,,- - लामणदिवा - पृ.११५
४ -,,- - आमोद सुनासि आले - पृ.९२
५ -,,- - ,, - पृ.१००
६ -,,- - ,, - पृ.५३
७ -,,- - ,, - पृ.५
८ -,,- - पाच हजार गायी - पृ.२७
९ -,,- - ,, - पृ.६
१० -,,- - ,, - पृ.७१
११ -,,- - ,, - पृ.१०७
१२ -,,- - ,, - पृ.१०९
१३ -,,- - ,, - पृ.९५
१४ -,,- - ,, - पृ.४४
१५ -,,- - लामणदिवा - पृ.१२४
१६ -,,- - ,, - पृ.६८
१७ -,,- - आमोद सुनासि आले - पृ.१७
१८ -,,- - ,, - पृ.९३
१९ -,,- - ,, - पृ.५४
२० -,,- - ,, - पृ.६४
२१ -,,- - पाच हजार गायी - पृ.६
२२ -,,- - ,, - पृ.१०८
२३ -,, - पाच हजार गायी - पृ.५१

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | दि.बा.मोकाशी | - पाच हजार गायी | पृ. ६५ |
| २५ | ,, | - ,, | पृ. ७२ |
| २६ | ,, | - ,, | पृ. ३१ |
| २७ | ,, | - ,, | पृ. ११९ |
| २८ | ,, | - लामणदिवा | पृ. १५ |
| २९ | ,, | - लामणदिवा | पृ. ४३ |
| ३० | ,, | - ,, | पृ. ८९ |
| ३१ | दि.बा.मोकाशी | - लामणदिवा | पृ. ११५ |